Title Code- MAHMAR-51647

प्रकाशोत्सव २०२३

# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com

वर्ष २ रे | अंक : दिपावली विशेषांक | रविवार दि. १२ नोव्हेंबर २०२३ | पृष्ठ ३२ | किंमत ३ रुपये




बुलडाणा अर्बन परिवार

# समृध्दी महामार्ग विषय चिंतनाचा - राधेश्यामजी चांडक उर्फ भाईजी

नागपुर ते मुंबई या रस्ते प्रवासासाठी लागणा-या वेळेची बचत व्हावी यासाठी केंद्र सरकार व राज्य सरकारने नागपुर मुंबई समृध्दी महामार्गाची महत्वाकांक्षी योजना राबवून ७०० कि. मी. चा समृद्धी महामार्ग निर्माण केला व डिसेंबर २०२२ मधे त्याचे लोकार्पणही करण्यात आले. परंतु गेल्या ६-७ महिन्यात या रस्त्यावर जवळपास ३५० हून अधिक अपघात झाले आणि त्यात १०० च्या जवळपास मृत्यु झाले ही बाब मन विषण्ण करणारी व चिंतन करण्यास भाग पाडणारी आहे. वास्तविक आज पर्यंत जेवढे अपघात झाले ते चालकाच्या अनियंत्रीत वेगामुळेच झाले असे वाटत असते तरी अपघातांची वाढत जाणारी संख्या पहाता प्रत्येक वेळेस वेगवेगळी कारणे समोर आलेली आहेत, त्यात सिमेंटच्या रस्त्यामुळे टायरमधील हवेचा वाढलेला दाब यामुळे टायर फुटून होणारे अपघात, रस्त्यावर नादुरुस्त झालेले वाहन उभे राहील्यामुळे झालेले अपघात, वाहन चालकांना समोरील वाहनाच्या वेगाचा न आलेला अंदाज व वाहन चालकाला लागलेली झोपेची डूलकी बरेचदा वाहन चालकाला झोपेची डुलकी लागत असतानाही पुढे कुठेतरी थांबू असा विचार करून वाहन चालक थांबत नाही परिणामी अपघात होतात. आदी कारणावरच विचार करण्यात आता आहे परंतु नामपुरच्या विश्वेश्वरय्या नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी या संस्थेने काढलेला निष्कर्षही चिंतन करायला लावणारा आहे, त्यांच्या मते एखादे वाहन महामार्गावर कोणत्याही अडथळ्याशिवाय सरळ रेषेत



धावत असेल तर चालक त्या परिस्थितीला सरावतो व त्याची शारीरीक हालचाल स्थिर होते चालकाचा मेंदु हा क्रिएच्या प्रक्रिएसाठी सक्रीय नसतो चालकाच्या या मनस्थितीलाच महामार्ग संमोहन असे म्हटले जाते चालक आवश्यक तेवढा दक्ष न राहील्यामुळे त्याचा काही सेकंदाचा बेसावधपणा अपघाताला कारणीभूत ठरतो या सर्वच बाबींवर खरेतच चिंतन होणे खुप गरजेचे आहे. मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर जवळपास याच वेगाने वाहने चालतात परंतु त्याठिकाणी अशा प्रकारचे अपघात होत नाही, अर्थात ही खुप समाधानाचीबाव आहे. परंतु मला तरी असे वाटते की मुंबई-पुणे हा वळणाचा असलेला रस्ता ठरावीक अंतरावर असलेले रिफ्रेशमेंट सेंटर व मोठ्या प्रमाणातील वाहनाची वर्दळ यामुळे तेथील अपघाताचे प्रमाण नगण्य आहे, तर मग तशीच सुविधा समृध्दि महामार्गावर का नसावी हा ही एक चिंतनाचा विषय आहे. या सर्व परिस्थितीवर फक्त चिंतन करून काही होणार नाही तर त्यावर उपाययोजना तात्काळ होणे गरजेचे आहे. समृद्धी महामार्गावर फक्त पेट्रोलपंपाची व्यवस्था आहे पण वाहनातील प्रवाशांना रिफ्रेशमेंटची व्यवस्था नाही हॉटेल किंवा नादुरुस्त वाहनांच्या दुरुस्तीची व्यवस्था उपलब्ध नाही. दुरदुर पर्यंत थांबण्यायोग्य जागा उपलब्ध नसल्यामुळे वाहन चालक थांबत नाहीत त्यामुळे वरील कुठले तरी कारण आपघातास कारणीभूत ठरत असावे यासाठी शासनाने दर ४० कि.मी. अंतरावर रिफ्रेशमेंट सेंटर तात्काळ सुरु करणे गरजेचे आहे. त्याठिकाणी पेट्रोलपंप, हॉटेल, वाहन दुरुस्तीची व्यवस्थेसोबतच टोईंगव्हॅन दवाखाना, अम्बूलन्स आदी व्यवस्था करणे गरजेचे आहे जेणे करुन अपघात होणारच नाहीत असे वाटते आणि तेच सर्वात महत्वाचे आहे.समृद्धी महामार्गावर घडणारे अपघात हा सर्वांसाठीच एक चिंतनाचा विषय आहे व त्यावर गंभीरपणे चिंतन होण्याची गरज आहे असे मला वाटते.

**- राधेश्यामजी चांडक (भाईजी)**
**बुलडाणा अर्बन सर्वेसर्वा**









हे पत्र मालक प्रकाशक व संपादक जितेंद्र देवचंद कायस्थ यांनी सर्वज्ञ प्रिंटर्स बुलढाणा येथे मुद्रित करून दैनिक जनसंचलन कार्यालय शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स बुलढाणा येथे प्रसिद्ध केले. अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी दैनिक जनासंचलन मुद्रक, मालक व संपादक सहमत असतीलच असे नाही मो.नं. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# उडता महाराष्ट्र..!

**ड्रग्स कोकीन, अफीम, गांजाचा महापूर म्हणजे उडता महाराष्ट्र. पंजाबच्या धर्तीवर उडता पंजाबचे लोन महाराष्ट्रात पोहोचलेले आहे. सुपरस्टार शाहरुख खानच्या मुलाजवळ काही प्रमाणात ड्रग्स आढळले. यापूर्वीही बॉलीवूडमधील सुपरस्टार ड्रग्स सेवन करताना आढळले. परंतु सदर ड्रग्स कोकीणचे लोन आता महाराष्ट्रातल्या गल्लीगल्लीत पोहोचले आहे. मेट्रो पोलिटीन सिटीमध्ये आढळणारा ड्रग्स आता पानपट्टीवर सुद्धा विक्री होतांना दिसत आहे. शालेय विद्यार्थ्यांच्या दप्तरात, बॅक्समध्ये ड्रग्स आढळत आहे.**



ललित पाटील यांचे बंधू आणि त्यांच्या सहकारी मैत्रिणींनी चक्क नाशिक मध्ये ड्रग्सचा कारखाना उघडला.२०२० पासून जेलमध्ये असलेला ललित पाटील शासन प्रशासनाच्या सहकार्याशिवाय जेलमध्ये राहून ससून हॉस्पिटल मध्ये ऍडमिट होतो. पुण्यातील ससून हॉस्पिटल मधून ड्रग्सचे रॅकेट चालवतो. १६ महिने इलाज करतो. त्यानंतर ससून रुग्णालयातून फरार होतो. १७ दिवसानंतर ललित पाटीलला पुन्हा अटक होते. हे सगळं पिक्चर मधल्या कथानायका सारखाच आहे. तर यामधून शासन प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर अविश्वासाचे ढग पसरले आहे. या संपूर्ण प्रकरणाची सर्वकष चौकशी करून सर्वांवर कारवाई केली पाहिजे. तर कारवाई करायची म्हटल्यास डझनभर मंत्री, डझनभर अधिकारी आणि शासकीय प्रशासकीय कर्मचारी आरोपी म्हणून जेलमध्ये जातील. या भीतीनेच ललित पाटील यांना सर्वंकश मदत केल्याशिवाय पर्याय नाही. त्यामुळेच ललित पाटील फरार झाल्यानंतर अटक होतो आणि मीडियाला सांगतो मी पळून गेलो नाही मला पळवण्यात आला आहे हे वाक्य सर्व काही सांगून जाते. त्यामुळेच पंजाबच्या धर्तीवर उडता महाराष्ट्र येणाऱ्या युवा पिढीसाठी जीवघेणा ठरतोय. सद्यस्थितीत उडता महाराष्ट्र शालेय विद्यार्थी विद्यार्थिनींच्या जीवावर उठलाय. सुज्ञ नागरिकांनी उडता महाराष्ट्राचा भाग आपल्या परिवारातील सदस्य होईल या भीतीने तरी सदर प्रकरणावर आवाज उठवणे क्रमप्राप्त आहे. अन्यथा उघड्या डोळ्यांनी आपला मुलगा मुलगी या व्यसनाच्या आहारी जाऊन नरक यातना सोसण्याची वेळ सुज्ञ पालकांवर आल्याशिवाय राहणार नाही. वर्तमान परिस्थितीत वर्ग पाचवी कक्षातील मुलापासून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपर्यंत लोकांपर्यंत ड्रग्स, अफीम, कोकीन,गांजा, चरस तर सामान्य कुटुंबातील विद्यार्थी पंचर काढणाऱ्या बॉन्डची नशा करून उडता महाराष्ट्राचा भाग होत आहे. शासन प्रशासनासह लोकप्रतिनिधीचा काना डोळा आणि सामाजिक कार्यकर्त्यांची लोकचळवळ क्षीण होताना दिसत आहे. सदर विदारक परिस्थितीची जनजागृत व्हावी. तर पालकांनी आपल्या मुलांसाठी कर्तव्यदक्षतेच्या भावनेतून केलेला सदर संवाद निश्चितच येणाऱ्या काळात जनजागृतीसाठी दिशादर्शक ठरेल. परिस्थिती शासन प्रशासनाच्या आवाक्या बाहेरची असली तरी एक नागरिक म्हणून केलेले प्रामाणिक प्रयत्न निश्चितच परिस्थिती बदलायला निमित्त मात्र ठरतील यातही दुमत नाही.

**मानाके अंधेरा बहुत है,**
**लेकिन दिया लगाना कहा मना है.**

**ॲड.सतीशचंद्र रोठे,**
**राष्ट्रीय अध्यक्ष**
**आझाद हिंद शेतकरी संघटना.९६३७२३०९९९**



# संत तुकारामांची दिवाळी

**दसरा दिवाळी, तोचि आम्हा सखा।**
**सखे संतजन भेटतील ।।**
**आमूपं जोडल्या पुण्याचिया राशी।**
**पार त्या सुखासी । नाहि लेखा।।**

सखे संत जेव्हा भेटतात तोच आमचा दसरा-दिवाळीसण. आम्ही अमाप पुण्याच्या राशी कमावलं आहे त्यामुळे आमच्या सुखाला आता पारावर राहिला नाही. दिवाळी सण म्हटलं म्हणजे आनंदी आनंद! सुगी झालेली असते, पाऊस थांबलेला असतो. रानात भरपूर चारा झालेला असतो, त्यामुळे जनावर खाऊन, पिऊन पुष्ट झालेली असतात. पिकं घरात आलेली असतात. त्यामूळे कुणबीही आनंदी असतो. बळीराजा सुखी तर जग सुखी! त्यामुळे अलुतेदार, बलुतेदारही खुश असतात. सर्व भूमी, डोंगरच्या हिरव्या शालूने नटलेल्या असतात. ओढे-नाले भरून वहात, उपसतात, तळी भरलेली असतात. सर्व सृष्टीच आनंदाने न्हाऊन निघालेली असते. दिवाळी म्हटली की घर आवरणार, नवा रंग देणार, भांडीकुंडी, डबेबाटल्या, आंथरुण-पांघरूण सर्व धुवून, पुसून लखलखीत करणार! सासरी गेलेल्या लेकी माहेरी येणार! कष्टकऱ्यांच्या, जीवनात गोडधोड, सांग्रसंगीत स्वयंपाकालाही निमित्त दिवाळीचच। दिवाळीचं फराळ म्हणजे बालगोपालानां मेजवानीचं! सासरी गेलेल्या लेकीला माहेरच्या मूळ कधी येणार याची आस लागते. धुणंभाडी, स्वयंपाकपाणी सगळं करत असताना तिचीनजर परत परत रस्त्याकडे जात असते. तीला माहेरची ओढ लागलेली असते. तिचं बालपण, बालपणाच्या मैत्रीणी, तिचं घर, अंगण, गाव सार तिच्या नजरेपुढे फेर धरून नाचत असतात. मन आठवणीच्या हिंदोळ्यावर डोलत असतं, त्या आठवणींनी तीच्या जीवाला हुरहुर लागते, सासुरवाशीणीच्या त्या मनःस्थितीचं दर्शन संत तुकाराम महाराज त्यांच्या ऐका अभंगातून फार मार्मिक शब्दात करतात.

**दिवाळीच्या मुळा. लेकी आसावली।**
**पाहतसे बाटुली, पांडुरंगे ।।**

अशी ही दिवाळी साऱ्या नात्यांना उजाळा देते आनंद देते वर्षभराचे सर्व कष्ट, दुःख पचवायची ताकद देते. जगण्याची उर्जा देते. संत तुकाराम महाराजांना हा आनंद, हा उत्साह, ही उर्जा संतांच्या भेटीतून मिळते म्हणून जगत्गुरू तुकाराम महाराज म्हणतात- दसरा दिवाळी तोचि आम्हा सण सखे संतजन भेटतिल ! या अभंगातून तुकाराम महाराजांनी संताबद्दल असलेला अतिव आदर, जिव्हाळा, आत्मियता, ओढ व्यक्त होते. संताना तुकाराम महाराज सखे म्हणाजे जिवलग मित्र म्हणतात. सगेसोयरे म्हणतात.



संत तुकाराम महाराजांचे हे सगेसोयरे म्हणजे संत नामदेव, संत ज्ञानदेव, संत जनाई, संत चोखोबा, संत सोयराई, संत कबीर, संत सज्जन कसाई, संत दादू पिंजारी, संत नरहरी सोनार, संत सेना, संत सावता अशी संताची मांदियाळी म्हणजे तुकाराम महाराजांचे सगेसोयरे आहेत. म्हणून ही सर्व मंडळी जेव्हा घरी येतात तेव्हा तो दिवस तुकाराम महाराजाना दसरादिवाळी इतका आनंदाचा आणि महत्वाचा सण वाटतो. तेराव्या शतकातले संत नामदेव, संत जनाई वगैरे सतराव्या शतकातल्या तुकाराम महाराजांना घरी करते येणार? असा प्रश्न एखाद्याला पडू शकतो. कितीही महान व्यक्ती असली तरी तिचे शरीर मर्त्यच असंत. पण शरीर जरी मर्त्य असल तरी त्यांचा विचार अमर असतो. आज ही सर्व संत मंडळी त्यांच्या साहित्यातून आपल्याशी बोलतात. संवाद साधतात. आपल्यारी हितगुज करतात. दिशा दाखवतात. मार्गदर्शन करतात, त्यांच्या आयुष्यातल्या सुखदुःखाच्या गोष्टी सांगतात. त्यांच्या आयुष्यातले संघर्ष, त्यांनी दिलेले लढेः सोसलेले आघात, त्या काळचा समाज, लोकांची स्थिती लोककढी, लोकजीवन अशा सर्वाबद्दल संत आपल्याशी बोलतात. इतिहास सांगतात, भविष्याकडे निर्देश करतात. वर्तमानात जगतांना कसे जगावं ते शिकवतात, आपले सखेसोबती, मायबाप आपल्यासाठी जे जे करतात ते सर्व संत आपल्यासाठी करतात. म्हणून त्यांचं घरी येणं हाच खरा दिवाळी दसरा असे जगत्गुरु संत तुकाराम महाराजांना वाटतं. पारंपारिक दिवाळीपेक्षा ही दिवाळी तुकाराम महाराजांनी महत्वाची वाटते.

दिवाळी म्हटली की दिवाळी पाडवा आलाच. यालाच बळीप्रतिपदा असंही म्हणतात. या दिवशी ब्राम्हणांच्या घरी शेणाचा बळीराजा करून त्याची दर्भाच्या काडीने हत्या केली जाते. तर बहुजन सम बळीराज्याच्या प्रतिमेचं पूजन करून बळीराजांचा जय जयकार करतो. बहुजन स्त्रीया इडापिडा टळो, आणि बळीचं राज्य येवो अशी इच्छा व्यक्त करतात. हा बळीराजा कोण? त्यांच्याबद्दल हजारों वर्षानंतर ही बहुजनाच्या मनात इतका आदर का ? प्रेम का? शेतकऱ्याला आजही बळीराजा का म्हटले जाते ? पोथ्या पुराणातून ज्या बळीला वामनाने तीन पावलात पाताळात घातलं म्हणून सांगितलं आहे, , याच पोथ्यापुराणातून बळीराजाचं कर्तृत्व, दार्तृत्व, प्रजाहितदक्षता, याचं कौतुकही केले आहे. बळीच्या राज्यात पाऊस वेळेवर पडत होता धनधान्याने शेती फुललेली असायची. बळीराजाची सर्व प्रजा सुखी होती, त्याच्या जाण्याने सर्व प्रजेला अतिशय दुःख झालं. प्रजेन विलाप केला बळीराजा हा चिरंजीव आहे असं समजल जाते. आणि दरवर्षी तो आपल्या प्राणप्रिय प्रजेला भेटण्यासाठी पाताळातून पृथ्वीवर येतो असं सांगतात. आपली प्रजा दुःखी असलेली दिसली तर त्याला अतीव दुःख होईल. आपल्या प्राणप्रिय बळीराजाला दुःख होऊ नये म्हणून प्रजा आपले दुःख त्याच्या नजरेस पडणार नाही, आपण आनंदी आहोत असे दर्शवण्यासाठी नटते, थटते, नवे कपडे, दागदागिने, घरादारांग, खायाला गोडधोड पदार्थ असं करून खुप आनंदी असल्याचं दाखविते. आपली प्रजा सुखा- समाधानात असल्याचं पाहुन, बळीराजा आनंदी होतो आणि समाधानाने पुन्हा पाताळी जातो अशी ही कथा आहे. प्रश्न असा आहे की आपल्या प्रजेच्या सुखाने सुखी होणाच्या आणि प्रजेचे दुःख पाहुन दुःखी होणाऱ्या या थोर बळीराजाला विष्णूने वामनाचा अवतार घेवून पाताळी का घातले? सतं तुकाराम महाराजांनी आपल्या एका अभंगावून-

**बळी सर्वस्वे उदार। ज्याने उभारीला कर.**
**त्याला करूनी कहार। पाताळी घातला ।।**

अशा स्पष्ट शब्दात या घटनेचा निषेध केला आहे. कहर म्हणजे टोकाचं नुकसान, भयंकर जुलूम, अत्याचारः पोथ्या पुराणातून ज्या कथा सांगितल्या गेल्या त्यात दडलेल्या एका प्रदीर्घ सांस्कृतिक संघर्षाच्या इतिहासाची जाण होती. संत तुकारामानां आपलं बळीशी असलेलं नातं माहित होत. पण आजच्या बहुसंख्य कीर्तनकारांना याचं ज्ञानही नाही. त्यांना कीर्तन पाठशाळेत जेवढं शिकवलं तेवढंच ते पाठ करतात आणि पोपटा सारखी त्याची री ओढतात. यामुळे ते श्रोत्यांचीही दिशाभूल करतात, जनतेला फसवतात. ही जाणिव होण्यासाठी पोथ्यापुराणं चिकित्सकपणे अभ्यासली पाहीजे. त्यातलं सार असार समजून घेतले पाहिजे. यावर अभ्यास, संशोधन केलेल्या संशोधकांचं लिखाण वाचले पाहिजे, त्यावर चिंतन केलं पाहिजे. पोथ्यापुराण ब्राम्हणांनी लिहुन ठेवल्या, त्या लिहीतांना त्यांचे उद्देश समाजावर स्वतःचे महल ठसवायचे, सर्वांच्या मनावर, आपलं प्रभुत्व ठसवायचं असेच होते, त्यामुळे त्यांनी जे मांडलं ते जसच्या तसे स्विकारण हा मूढपणा आहे. संत तुकाराम महाराजांनी सांगितल्या प्रमाणे - सत्य असत्यासी

**मन केले ग्वाही । मनिले नाही बहुमता।।**

याप्रमाणे योग्य-अयोग्य ठरविले पाहिजे, राहुल सांकृत्यायनांपासून प्राच्यविद्यापंडित शरद पाटील, डॉ. आ. ह. साळुंखे यांसारख्या अभ्यासकांनी, विचारवंतानी प्रकांड पंडितांनी जे संशोधन करुन सत्य माडंल आहे ते समजून घेतलं पाहिजे. आपल्या रूढ समजुतीपेक्षा वेगळं काही असलंकी लगेच त्यावर काहीतरी शिक्का मारून पाठ फिरवणे ही संत तुकाराम महाराजांची शिकवण नाही. आपण संत तुकाराम महाराजांचे वारसदार आहोत.

प्र प्रस्थापित, जुलमी समाज व्यवस्थे विरोधात बंड करणाऱ्या संत शिरोमणी नामदेव महाराज, धार्मिक ज्ञान फक्त संस्कृतमध्येच हा दंडक मोडून गीतेच प्राकृत भाषेत भाषांतर करणाच्या बंडखोर संत ज्ञानदेवांचे आपण वारस आहोत.

**वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा।**
**येरांनी वाहावा। भार माया ।।**

असे म्हणुन धर्मशास्त्रावरची ब्राह्मणांची मक्तेदारी मोडून काढणाऱ्या आणि आपल्या बुद्धीने विचार करून वेदा विर्यशक्ती नाही या निकषावर येणाऱ्या संत तुकाराम महाराजांचे आपण वारस आहोत, वारकरी कोणावरही अंधविश्वास ठेवत नाहीत. आपल्या संतानीच आपल्याला बंड करायला शिकवलं आहे.

प्रश्न विचारायला शिकवलं आहे. आपल्या बुद्धीने विचार करायला शिकवलं आहे.

संताची हो शिकवण ध्यानी धरून आपण दिवाळी साजरी करूया फटाके मुक्त दिवाळी, प्रदुषणमुक्त दिवाळी, आपल्या आनंदात इतरांना सहभागी करून घेणारी दिवाळी, इतराचं दुःख हलके करणारी दिवाळी साजरी करू या!

आपल्या सर्वांच्या मनात सदविचाराचे, संतविचाराचे, सत्याचे लक्ष लक्ष दिप उजकोत हीच संत तुकाराम अर्बन बुलडाणा परिवाराच्या वतीने हार्दिक शुभेच्छा

**– गिरीश वाघमारे**
**अध्यक्ष**
**संत तुकाराम अर्बन बुलडाणा**

# काळरात्र...

दररोज अंगवळणी असले तरी
एखादी पायरी एखाद्या वेळी चुकते

मग चुकत जातात हळूहळू
शंका कुशंकांची त्रिकोणे
आणि आपला शोध फिरत राहतो
गोल गोल, गोल गरगरीत वर्तुळाच्या
परिघावर
माणसं येतात, स्पर्शून जातात
स्पर्शिकां सारखी, वर्तुळ भेदू शकत नाहीत
आपण आतच अडकून पडतो

चक्रव्यूहात...अभिमन्यू बनून

गावात प्रेमाचा पूर येतो, कविता वाहतात
गाव उध्वस्त होते, पूर ओसरून जातो
मागे उरतो, तो फक्त आठवांचा चिखल
गावात पसरलेला भावनांचा कुबट वास
विश्वासाच्या उडालेल्या चिंधड्या चिटकून
राहतात प्लास्टिक सारख्या...बाभळीला



# बहिण-भावाचा सण भाऊबीज...
# असे आहे या सणाचे महत्व

भाऊबीजेच्या दिवशी मृत्यूचा देव म्हणजेच यमराज आपली बहीण यमुनेकडे गेला होता अशी अख्यायिका आहे. यमराज आपल्या बहिणीकडे गेल्यानंतर तिने त्याला जेवू घालून त्याचे औक्षण केले आणि यमराजाच्या सुखी आयुष्यासाठी प्रार्थना केली. यावेळी प्रसन्न होऊन यमराजाने बहीण यमुनाला वरदान मागण्यास सांगितले.

दिवाळीच्या ठीक तीन दिवसांनी भाऊबीज (२०२३) हा सण साजरा केला जातो. यावर्षी भाऊबीज १५ नोव्हेंबरला येत आहे. रक्षाबंधनाप्रमाणेच भाईदूज हा देखील भाऊ-बहिणीचा सण आहे. या दिवशी सर्व बहिणी आपल्या भावाच्या दीर्घायुष्याची



कामना करतात आणि व्रत देखील पाळतात.

ज्याप्रमाणे रक्षाबंधनाच्या दिवशी बहिणी आपल्या भावाच्या मनगटावर धागा बांधतात, त्याचप्रमाणे भाऊबीजेच्या दिवशी बहिणीह आपल्या भावाला ओवाळते. त्यांच्या बांधवांना रोली आणि माऊली बांधून आशीर्वाद द्या. यानंतर, ती तिच्या भावाला मिठाई खाऊ घालते आणि त्याला नारळ देते

दिवाळीसोबतच भाऊबीज हा सण भारतभर मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो.

वेगवेगळ्या ठिकाणी तो साजरा करण्याच्या वेगवेगळ्या समजुती आहेत. उत्तर भारतात, बहिणी आपल्या भावांना औक्षवण करतात, तर पूर्व भारतात, शंख फुंकल्यानंतर आधी चंद्राला ओवाळतातनंतर भावाला ओवाळतात. या दिवशी बहिणी आपल्या भावाच्या दीर्घायुष्यासाठी उपवास ठेवतात आणि भावाला भोजन औक्षवण केल्यानंतर उपवास सोडतात.

भाऊबीज का साजरा केली जाते? भाऊबीजेच्या दिवशी मृत्यूचा देव म्हणजेच यमराज आपली बहीण यमुनेकडे गेला होता अशी अख्यायिका आहे. यमराज आपल्या बहिणीकडे गेल्यानंतर तिने त्याला जेवू घालून त्याचे औक्षण केले आणि यमराजाच्या सुखी आयुष्यासाठी प्रार्थना केली. यावेळी प्रसन्न होऊन यमराजाने बहीण यमुनाला वरदान मागण्यास सांगितले. यावेळी यमुना म्हणाली की तू दरवर्षी या दिवशी माझ्या घरी ये. शिवाय या दिवशी जी बहीण आपल्या भावाला औक्षण करेल ती तुला घाबरणार नाही. यमराजाने बहिणीच्या मागण्यानुसार तिला वरदान दिले. याचा दिवसापासून भाऊबीज उत्सवाला सुरुवात झाली असे सांगितले जाते. त्यामुळेच या दिवसाला यमद्वितीया देखील म्हटले जाते.







# अनाथांची दिवाळी...



कधी मिळतील का आम्हाला?
चमचमीत जेवणाचे दोन घास...!
कधी येतील का आमच्या वाट्याला?
ते दोन क्षण सुखाचे खास...!

अरे भटकावं लागत आम्हास,
त्या दोन वेळच्या भूकेसाठी...!
पण कोणाला त्याच काय?
इथे जगतात सगळे स्वार्थासाठी...!

हवं असत आम्हालाही,
हक्काचं एक घर...!
जिथे करू आम्ही साजरी,
दिवाळी ती सर्वान बर...!

आम्हा कोण देईल मिठाई,
सांगा ना आता तुम्ही...!
कोणाची आस लावून वाट पाहू,
कधी होऊ का आनंदी आम्ही?

सतत वाटतं आम्हालाही,
यावे कुणीतरी देवदूत बनूनी...!
झेलावे आमचे थोडे दुःख,
ते माझचं आहे म्हणूनी...!

आमच्या नशिबी आहे की नाही?
माहित नाही हा दिव्यांचा प्रकाश...!
पण दुरुन नेहमीच आम्ही पाहतो,
ताऱ्यांनी भरलेले गच्चं आकाश...!

श्रीमंतहो! जमलं तर ऐका,
आमची ही साद हिवाळी...!
थोडसं दान आम्हासाठी करा,
आम्हीही करु साजरी आम्हा
अनाथांची दिवाळी...!

**-स्नेहल मिना मधुकर कदम**
**खानापूर, सांगली.**

# वयोवृद्धांच्या हाती नोटा; तरुणांच्या हाती दंगलीचा गोटा



एकीकडे सुशिक्षित बेरोजगार तरुण नोकरीच्या शोधात आहे त्याच्या हाताला काम मिळत नाही. मात्र दुसरीकडे जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये रिक्त असलेल्या जागेवर सेवा निवृत्त शिक्षकांची कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्याचा राज्य सरकारने घेतला आहे. या निर्णयामुळे तरुणांमध्ये प्रचंड चिड निर्माण झाली असून ते वयोवृद्धांच्या हाती नोटा; तरुणांच्या हाती दंगलीचा गोटा या सरकारचे धोरण आहे असे म्हणताना दिसत आहेत. महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने काढलेल्या परिपत्रकात सांगितले की, राज्यातील सर्व शाळा ह्या जून महिन्यात सुरु झालेल्या असून जिल्हा परिषद शाळांतील शिक्षकांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तसेच, नियोजित शिक्षक भरती संदर्भात मा. उच्च न्यायालयात दाखल रिट याचिकांमुळे भरती प्रक्रीयेस विलंब होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. या सर्व परिस्थिती विचारात घेऊन पवित्र प्रणालीमार्फत नियमित शिक्षक भरतीमधून शिक्षक उपलब्ध होईपर्यंत, स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळांतील व खाजगी शिक्षण संस्थांच्या अनुदानित शाळांतील सेवानिवृत्त शिक्षकांमधून कंत्राटी तत्त्वावर तात्पुरत्या स्वरुपात जिल्हा परिषद शाळांतील रिक्त शिक्षकीय पदे येणार आहेत. राज्य सरकारकडून या शिक्षक भरतीसाठी कमाल वयोमर्यादा ७० वर्ष अशी केली आहे. या सेवा निवृत्ती शिक्षकांना प्रतिमहा मानधन रु.२०,०००/- (कोणत्याही इतर लाभाव्यतिरिक्त) मिळणार आहे. यासाठी जिल्हा परिषदेच्यावतीने शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याशी करारनामा स्वाक्षरीत करणे आवश्यक असणारं आहे. तसेच बंधपत्र / हमीपत्र: नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने शिक्षकीय पदाचे विहीत काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहणार असून आशयाचे बंधपत्र / हमीपत्र द्यावे लागणार आहे. शालेय शिक्षण विभागातील रिक्त जागा तात्काळ भराव्यात या मागणीसाठी अनेक वर्षांपासून आंदोलने निदर्शने करणा-या तरुणांसाठी हा शासन निर्णय म्हणजे धोक्याची घंटा असल्याचं सांगितलं जातं आहे. उच्चशिक्षित तरुण नोकरीच्या शोधात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींना दरवर्षी दोन कोटी तरुणांना नोकरी देऊ असं सांगितलं होते, आता मात्र तरुणांना दंगलीसाठी प्रवृत्त करून हाती दगड गोटे दिले आहेत तर दुसरीकडे वयोवृद्ध निवृत्तधारकांना नोकरीच्या संधी निर्माण करून हाती मानधनाच्या नोटा दिल्या जात असल्याने तरुणांमध्ये प्रचंड चिड निर्माण झाली आहे.



# विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्याः चिंतनाचा विषय

आपल्या पिढीने खऱ्या अर्थाने बालपण जगले आहे. मित्रांबरोबर भर उन्हात अनवाणी शेतांमध्ये फिरायचं..बोरं पाडायची खायची.. खिशात भरायची.चिंचेच्या झाडाच्या चिंचा पाडून खायच्या तर झाडावर चढून डाबडुबली खेळायची,झाडाच्या या फांदीवरून त्या फांदीवर जायचं,फांदीला लटकायचं आणि तशीच कुठलाही विचार न करता खाली उडी मारायची असं बालपण आपण जगलो. ना कुणी शोधायला यायचं ना घरचे फारशी काळजी करायचे.आज मोबाईल युग असल्याने १० मिनिटे मुलांना शाळेतून यायला उशीर होताच आताच्या पालकांचा जीव भांड्यात पडतो व मुलांचा शोध सुरू होतो.

सध्याचे युग हे स्पर्धेच युग असल्याने आताची मुलं ह्या निखळ आनंदाला मुकली आहेत. स्पर्धेच्या युगात पालकांनी त्यांचा पुरता रोबोट करून टाकला आहे.तू जेईई च झाला पाहिजे,तू नीट उत्तम गुणांनी उत्तीर्ण होत डॉक्टरच झाला पाहिजे असे अपेक्षांचे ओझे पालक आपल्या मुलांच्या खांद्यावर टाकत आहेत.

मुलं जन्माला येण्यापूर्वी त्याने काय व्हावं हे ठरवणारी पालकांची आजची पिढी त्यांना यंत्रमानव बनवत आहेत. आपला मुलगा प्रथमतः माणूस झाला पाहिजे. या समाजात तो माणूस म्हणून कसा जगेल असा दृष्टीकोन बाळगणारी पालक मंडळी आता दिसेनाशी झाली आहे. मुलांच्या भवितव्याच्या सतत चिंतेत असणाऱ्या पालकांनी स्वतःचा संसार डिस्टर्ब करत बायको मुलांसोबत तर पतीराज घरी हाताने स्वयंपाक बनवत तर कुठे मेस, हॉटेल मध्ये जेवायला



जात स्वतःची अबाळ करून घेत मुलांच्या खांद्यावर आपल्या स्वतः च्या अपेक्षांचे ओझे टाकताना दिसत आहेत.हे सगळं करणं अजिबात चुकीचे नाही.मात्र आपला पाल्य त्या कुवतीचा आहे का..? त्याची नेमकी आवड कशात आहे हे बघण्याचा पडताळण्याचा त्रास ते घेत नाहीत. नीट साठी एव्हडी धडपड करण्यापेक्षा त्याने जे करायचे ते नीट करावे. असे असणे गरजेचे असतांना मुलांना दाबून, दरडावून आपल्या अपेक्षांचे ओझे त्यांच्या खांद्यावर टाकल्या जात आहे. मुलं जन्माला येण्यापूर्वी त्याने काय व्हावं हे ठरवणारी पालकांची आजची पिढी त्यांना यंत्रमानव बनवत आहेत. आपला मुलगा प्रथमतः माणूस झाला पाहिजे. या समाजात तो माणूस म्हणून कसा जगेल असा दृष्टीकोन बाळगणारी पालक मंडळी आता दिसेनाशी झाली आहे. मुलांच्या भवितव्याच्या सतत चिंतेत असणाऱ्या पालकांनी स्वतःचा संसार डिस्टरब करत बायको मुलांसोबत तर पतीराज घरी हाताने स्वयंपाक बनवत तर कुठे मेस, हॉटेल मध्ये जेवायला

जात मुलांच्या खांद्यावर आपल्या स्वतःच्या अपेक्षांचे ओझे टाकताना दिसत आहे.हे सगळं करणं अजिबात चुकीचे नाही.मात्र आपला पाल्य त्या कुवतीचा आहे का..? त्याची नेमकी आवड कशात आहे हे बघण्याचा पडताळण्याचा त्रास ते घेत नाहीत. नीट साठी एव्हडी धडपड करण्यापेक्षा त्याने जे करायचे ते नीट करावे. असे असणे गरजेचे असतांना मुलांना दाबून, दरडावून आपल्या अपेक्षांचे ओझे त्यांच्या खांद्यावर टाकल्या जात आहे.

पालकांच्या अपेक्षांना आपण खरे उतरू शकत नसल्याने विद्यार्थी आत्महत्येसारखा चुकीचा मार्ग निवडत आहेत. या अनुषंगाने सीएनआरबी अर्थात नॅशनल क्राईम रेकॉर्ड्स ब्युरो ने दिलेली आकडेवारी धक्कादायक आहे. सन २०१६ मध्ये ९४७८ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद आहे.२०१७ मध्ये ९९०५ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली. हाच आकडा २०१८ मध्ये १०१५९ वर जाऊन पोहचला.

आपल्या राज्यात दरवर्षी १४०० विद्यार्थी आत्महत्या करतात. आत्महत्या करणाऱ्या देशातील ७ विद्यार्थ्यांमागे महाराष्ट्रातील एक विद्यार्थी असे याचे प्रमाण आहे. २०११ च्या तुलनेत आत्महत्येच्या प्रमाणात तब्बल ७० टक्क्यांनी वाढ झाली असल्याचे एन. सी. आर. बी. चा रिपोर्ट सांगतो. २०२१ मध्ये १,६४०३३ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली आहे.२०२० च्या तुलनेत ही ७.२टक्याने ही वाढ झाली आहे. दिवाळी पूर्वी प्रत्येक शाळा प्रथम सत्रांत परीक्षा घेत असते.यावेळी मराठीच्या इयत्ता ९ वी च्या प्रश्न पत्रिकेत अपठीत गद्य उतारा देण्यात आला आहे. त्यात कोटा सारख्या एकट्या शहरात विद्यार्थ्यांच्या झालेल्या आत्महत्यांचा उहापोह करण्यात आलेला आहे. स्पर्धा परीक्षेच्या बाबतीत देखील असाच प्रकार आहे. यूपीएससी च्या देशात ८००ते ९०० जागा भरल्या जात असतांना त्यासाठी १० लाख विद्यार्थी परीक्षेला बसतात तर एमपीएससी च्या २००-३०० जागेला ३ ते ४ लाख विद्यार्थी सामोरे जातात. स्पर्धा आणि पालकांच्या अपेक्षा प्रचंड वाढलेल्या असल्याने मुलं अपयश पचवू शकत नाहीत आणि परिणामी ते आत्महत्या सारखा चुकीचा मार्ग निवडतात. औद्योगिक दृष्ट्या एकेकाळी नावाजलेलं कोटा शहर आज एज्युकेशनल हब झाले आहे. तर याच कोटा शहरात दरवर्षी विद्यार्थ्यांच्या होत असलेल्या आत्महत्या चिंतेचा विषय बनले आहे. कुठल्याही कोचिंग क्लास चे सक्सेसचे प्रमाण केवळ १ ते २ टक्के आहे. मात्र स्वतःच्या बळावर किंवा इतर क्लास मधून यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांच्या फोटोचा वापर करत जाहिराती वर जोर देणारे क्लास आज आर्थिकदृष्ट्या गलेलठ्ठ झाले आहे.क्लासेस हा पैसा कमविण्याचा सरळ सोपा मार्ग झाला असून तेलघाण्याच्या बैला सारखे मुलांच्या खांद्यावर अपेक्षांचे जू टाकल्या गेलेले आहे.

तालुक्याच्या ठिकाणी दर आठ दिवसाला एका डॉक्टरच्या हॉस्पिटलचा शुभारंभ होतो आहे. जागोजागी दवाखाने थाटल्या गेलेले आहे. अपवाद वगळता नवीन डॉक्टर मंडळींना आपले हॉस्पिटल चे भाडे,कर्मचारी यांचे पगार यासाठीचे पैसे जमवतांना नाकी नऊ येत आहेत. तर वैद्यकीय शिक्षणावर करोडो रुपये खर्च झालेले असणे,हॉस्पिटल उभे करण्यासाठी लागणारा खर्च ह्यामुळे डॉक्टर मंडळी कसाया सारखा सुरा हातात घेऊनच तयार आहेत. केवळ डॉक्टर इंजिनिअर पेक्षा अनेक क्षेत्रात, व्यवसायात मुलांना करिअर करण्यासाठी अनेक क्षेत्र असतांना त्यांना त्यांच्या इच्छेनुसार व आवडीनुसार गगनभरारी घेऊ देणे महत्वाचे आहे .असे असतांना त्यांना आत्महत्येची वाट पालक स्वतः च दाखवत आहेत असे म्हटल्यास ते चुकीचे होणार नाही. आजच्या मुलांची स्पर्धेच्या आणि अपेक्षांच्या ओझ्यामुळे अशी अवस्था अशी झाली आहे की...

थक गई मेरी जिंदगी भी
लोगों को जवाब देते-देते
अब कहीं मेरी मौत ना..
लोगों का सवाल बन जाये ..

# आई...



आई म्हणोनी कोणी
आईस हाक मारी
ती हाक येई कानी
मज होय शोककारी
नोहेच हाक माते,
मारी कुणी कुठारी
आई कुणा म्हणू मी?
आई घरी ना दारी!
ही न्युनता सुखाची
चित्ता सदा विदारी

स्वामी तिन्ही जगाचा
आईविना भिकारी.
चार मुखी पिलांच्या
चिमणी हळुच देई
गोठ्यात वासरांना
ह्या चाटतात गाई
वात्सल्य हे पशूंचे
मी रोज रोज पाही
पाहुन अन्तरात्मा
व्याकुळ मात्र होई

वात्सल्य माउलीचे
आम्हां जगात नाही
दुर्भाग्य पाविना का
आम्हांस नाही आई
आता व्हाते भूईवर
गेलं गेलं आभायात!
मन केवढे केवढं?
त्यात आभाय मायेना!
------------

# पुण्य झाले खोटे

खमक्या मुर्दाळ । डकेट भेकाळ ।।
च्यतरा बह्याळ । झाला बावा ।।१।।
दौलत दाटली । ममता आटली ।।
गोधडी फाटली। जिव्हायाची ।।२।।
कुटला सरशी । ल्क्समी निरशी ।।
घराची तुयशी । उपावली ।।३।।
अज्जात झोकात । जगे लोकात ।।
डाकुच्या धाकात । गावगाडा ।।४।।
टिवीले मोर । निंबोयाले बोर ।।
सज्जनाले चोर । म्हने जग ।।५।।
देऊय खंडारं । किर्तन दंडार ।।
मानसं लेंढार । ढोरावानी ।।६।।
खऱ्याले जुलूम । खोट्याले सलाम ।।
ईचारं गुलाम । अग्यनानं ।।७।।
बेमानी अक्कल । लुबरी शक्कल ।।
बाजिंद टक्कल । आगलावे ।।८।।
पाप झालं मोठं । पुंन्य झालं खोटं ।।
गरीबाले चोटं । बच्चु म्हने ।।९।।

– बच्चु गावंडे
चांदुर रेल्वे, अमरावती


ज्ञानगंगा घरोघरी
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ, नाशिक
अभ्यासकेंद्र - जिजामाता महाविद्यालय, बुलढाणा 1301A
उपलब्ध सुविधा
1) B.A.
2) B.Com
3) M.A.Marathi
4) M.A.Economic
5) M.A.History
6) M.A.English
दिवाळी निमीत्त सर्वांना मंगलमय शुभेच्छा
डॉ.प्रशांत कोठे
केंद्रप्रमुख
प्रा.संजय सोनुने
केंद्रसंयोजक


ट्रायडीया 8180959813
शुभ दिपावली
दिपावलीच्या सर्व जनतेला
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
सतीश मेहेंद्रे
प्रशासकीय सरचिटणीस
जिल्हा काँग्रेस कमिटी, बुलडाणा


आनंदाचे दीप उजळू दे, सदैव आपल्या घरी, तनामनावर बरसत राहो, चैतन्याच्या सरी,
सौख्य, संपदा, समृध्दीला नुरो कदापी उणे दिपावलीच्या लक्ष दीव्यांचे हेच एक मागणे..
मिर्झा ब्रदर्स
बिल्डींग मटेरीयल सप्लायर्स मॅन्युफॅक्चर व सप्लायर्स
सर्व जनतेस दिपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा...!
गिट्टी • विटा • पेव्हर • मुरुम • रेती आर्टीफिशीयल
फिरोज मिर्झा 9422184095 / 9881244095
तमिज मिर्झा 9422181095 / 9767843233
स्टेडीयम कॉम्प्लेक्स, शॉप नं. ५५ जयस्तंभ चौक, बुलडाणा

# अजान का म्हंटली जाते? लाऊडस्पीकरची काय गरज?



**महाराष्ट्रात गेल्या ८ ते १० महिनाभरापूर्वी मशिदीवरील भोंग्यावरुन वाद सुरु झाला होता, मशिदीवरील लाऊडस्पीकर विरोधात मनसे प्रमुख राज ठाकरेंनी मशिदीसमोर हनुमान चालिसा पठणाचा आदेश मनसे कार्यकर्त्यांना दिला होता. यावरुन सध्या सामाजिक तणावाची स्थिती निर्माण झाली होती. या लेखात अजान का दिली जाते याबद्दल माहीती जाणून घेऊयात.**

अजान म्हणजे काय? अजान म्हणजे नमाजची वेळ झालीय, नमाजसाठी चला हे सांगण्यासाठीचा कॉल, बुलावा असतो. इस्लाममध्ये नमाजला अनन्यसाधारण महत्व आहे. दिवसभरात ५ वेळा नमाजपठण कर्तव्य मानलं जातं.जास्तीत जास्त लोकांपर्यंत नमाजच्या वेळेची माहीती पोहोचावी यासाठी अजान दिली जाते.अजान देण्याची सुरुवात कशी झाली-इस्लाम धर्माचा उद्य झाल्यानंतर सुरुवातीच्या काळात मदीन्यात नमाजसाठी लोक येत, तेव्हा मात्र वेळ लक्षात येत नसे. अनेकांनी ही समस्या सांगितल्यानंतर, या संदर्भात चर्चा करण्यात आली. त्यानंतर अनेकांनी चर्चसारखी घंटा वाजवण्यात यावी असा सल्ला दिला होता, तर काहींनी एखादं निशाण वर केलं जावं असा सल्ला दिला. पण हजरत उमर यांनी अजान दिली जावी असा सल्ला दिला. या प्रसंगाचा उल्लेख हदीस मध्ये (बुखारी) ५७८ मध्ये आढळतो. मुस्लिम एकेश्वर मानतात. या अजानमध्ये तुम्ही नमाजसाठी चला, नमाजची वेळ झालीय हे सांगितले जातं. अजान मुआज्जीन देतात, मुआज्जीन पाच वेळा अजान देणारी व्यक्ती असते. भोंगे नव्हते त्या काळात अजाण देण्यासाठी उंच जागेवर जाऊन अजान मोठ्याने दिली जायची. जेणेकरुन जास्तीत जास्त लोकांपर्यंत अजान पोहोचावी. पण लाऊडस्पीकर आल्यानंतर मात्र उंच जागेवर जाऊन अजान देणं हळूहळू बंद झालं. भारतात साधारणत: १९२० च्या दरम्यान आजानसाठी लाऊडस्पीकरचा वापर सुरु झालाय. अजानमध्ये प्रेषित पैंगबरांची स्तुती आणि नमाजसाठी या असं म्हंटलं जातं. अजान अरेबिक भाषेत दिल्ली जाते. अजान साधारणत: २ ते २.५ मिनिटांची असते. पुण्याचे जमाते इस्लामीचे करिमुद्दीन शेख यांनी ही माहीती दिलीय.सर्वोच्च न्यायालयाने ठरवून दिलेल्या नियमानुसार लाऊडस्पीकर वापरले पाहिजे, अशी भूमिका त्यांनी सकाळ ऑनलाईनशी बोलताना व्यक्त केलीय.तसेच जमाते इस्लामीकडून ५ वर्षांपासून मस्जिद परिचय हा उपक्रम राबविला जातोय. यात अजान, नमाज आणि मशिदीतील उपक्रमांविषयी माहीती दिली जात असल्याचं त्यांनी सांगितली.काय आहे सुप्रीम कोर्टाचा निर्णय- १८ जुलै २००५ मध्ये लाऊडस्पीकर संदर्भात सुप्रीम कोर्टाने निकाल दिला. या निकालपत्रात नागरिकांच्या अधिकारांविषयी बोलताना जबरदस्तीने कुठल्याही प्रकारचा गोंगाट, आवाज लादला जावू नये याला महत्व दिलंय. कुठल्याही धर्म आणि धार्मिक परंपरांचा नाही, तर नागरिकाच्या शांततेत जगण्याच्या आधिकाराचा विचार निकालपत्रात मांडण्यात आलाय. गोंगाटापासून मुक्तता हा जगण्याच्या मुलभूत अधिकार आहे. भारतीय घटनेच्या कलम २१ चा आधार घेत न्यायलयाने मूलभूत अधिकारांतर्गत हा निकाल दिलाय. त्यामुळे सकाळी ६ ते रात्री १० पर्यंतच लाऊडस्पीकरच्या वापराला परवानगी देण्यात आलीय. सण-उत्सवांच्या काळात जास्तीत जास्त १५ दिवस नियम शिथिल करण्याचे अधिकार राज्य सरकारकडे देण्यात आले आहेत. यासाठी अधिकृत परनावगी गरजेची आहे. रात्री १० नंतर केवळ एखाद्या बंद हॉलमध्ये होणाऱ्या कार्यक्रमातील वापर, ज्यात शेजाऱ्यांनाही त्रास होणार नाही, असा वापर करण्याला परवानगी दिली. उदा. बंद हॉलमधील कार्यक्रम, ऑडीटोरियम, कॉन्फरन्समधला वापर. तसेच आपातकालीन परिस्थितीत लाउडस्पीकरचा वापर कधीही करता येईन, असहाी न्यायालयाच्या निकालपत्रात म्हंटलेलं आहे.


धनाची पूजा, यशाचा प्रकाश, कीर्तीचे अभ्यंगस्नान, मनाचे लक्ष्मीपूजन, संबंधाचा फराळ, समृद्धीचा पाडवा, प्रेमाची भाऊबीज अशा या दीपावलीच्या

ग्रामपंचायत कार्यालय, भादोला तर्फे सर्व जनतेस

दीपावली अभिष्टचिंतन


श्री.प्रमोद वाघमारे
सरपंच


आमिन खा.रहिम खा.
उपसरपंच


श्री.समाधान नेवरे
ग्रामविकास अधिकारी

दिवाळी निमीत्त आमच्या सर्व खातेदार, सभासद सदस्य तसेच सर्व नागरीकांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा...

दीपावली शुभचिंतन

महाराष्ट्र व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मुंबई शासन मान्यता प्राप्त तसेच डि.जी.ई.टी. न्यु दिल्ली संलग्नता प्राप्त Quality Concil of India द्वारा मानांकीत

न्यु सिटिझन टेक्नीकल इन्स्टिट्युट द्वारा संचालित

न्यु सिटिजन खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बुलढाणा

एच.पी.गॅस एजन्सीजवळ, मलकापूर रोड, भडेच ले आऊट, बुलढाणा




प्रवेशासाठी संपर्क
फोन - 07262 - 245536
मोबा. - 9922517366 / 7498109985 / 3763273074 / 9175471014

# बाबा

बाबा असतो वडासारखा
मातीत घट्ट रूतुन कुंटुबाला सावली देणारा
स्वता: ऊन सोसणारा
पण लेकरांच्या पंखात बळ देणारा
कधी माय होऊन झुला झुलविणारा
तर कधी स्व:ताच्या वहाणा
लेकराला देणारा
कुंटुबाचे छत्र होऊनी
मायेची सावली धरणारा
प्रत्येक संकटाला सामोरे जाणारा
मुलांच्या हाकेला धाऊन येणारा
कुंटुबाला आधार देणारा
आयुष्यभर पिलांसाठी तग धरून
विस्तवावर चालणारा
आयुष्यभर नात्याला सिंचन देणारा
कधी घराची कौले, तर कधी घराच्या भिंती बांधणारा
प्रत्येकाच्या मनामध्ये ज्याचा त्याचा बाबा धडलेला असतो
मनाच्या कप्प्यांमध्ये ज्याने त्याने लपविलेला असतो









र.नं. ३७६

दि.
# मराठा अर्बन
## को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसा.लि. बुलडाणा

### संस्थेच्या सभासदांसाठी आकर्षक व्याज दर योजना

| | |
|---|---|
| १ महिने ते ३ महिने पर्यंत......... | ७.५ % |
| ४ महिने ते ६ महिने पर्यंत......... | ८ % |
| ७ महिने ते १२ महिने पर्यंत........ | ९ % |
| १३ महिने ते पुढे.................. | ९.५ % |

जेष्ठ नागरीक, अपंग, विधवा महिला व माजी सैनिक, वर्गाकरीता प्रचलित व्याजदरापेक्षा ०.५ % व्याजदर जास्त

सहकारी संस्था व इतर सार्वजनिक संस्था यांना प्रचलित व्याजदरापेक्षा ०.५ % व्याजदर जास्त

महिला बचत गटासाठी कर्ज उपलब्ध

### दामदुप्पट ठेव योजना

९६ महिन्यात रक्कम दामदुप्पट तसेच जेष्ठ नागरिकांसाठी ८४ महिन्यात दामदुप्पट

### माहवार लखपती ठेव योजना

२४५० प्रतिमाह- ३५ महिने- १०००००/-

१६०० प्रतिमाह- ४८ महिने- १०००००/-

१२५० प्रतिमाह- ५८ महिने- १०००००/-

६०० प्रतिमाह- ६० महिने- ५००००/-

### उपलब्ध सुविधा

- लॉकर सुविधा
- RTGS/NEFT सुविधा
- अल्प दरात ठेव योजना
- ठेवीवर आकर्षक व्याज दर
- डी.डी.सुविधा SMS सुविधा
- नेट बँकिंग मोबाईल बँकिंग
- ATM सुविधा

दिपावलीच्या शुभक्षणांनी,
आपली सारी स्वप्न साकार व्हावी..
हि दिवाळी आपल्यासाठी,
अनमोल आठवण ठरावी..
आणि त्या आठवणीने,
आपलं आयुष्य अधिकाधिक सुंदर व्हावं..!

दिवाळी शुभेच्छा

HAPPY DIWALI



संस्थापक अध्यक्ष
**श्रीकृष्ण रुस्तुमराव जेऊघाले**
मो. 9922389349

भरारी ग्राफिक्स 9921129511

# शहरी प्रदूषणावर मात शक्य

